# Saratoga Serendipity – Recreating a Konkan paradise near Houston, TX

- **Sharmila and Vikas Moharir** (Saratoga, TX)

When COVID erupted back in February, everything shut down and everyone stayed indoors. We spent endless hours completing Sudoku puzzles, and Sharmila Moharir, a former President of Houston Maharashtra Mandal, was consistently a Sudoku winner in the March-April-May timeframe of the Houston Indo-American News. After completing Sudoku and a 5,000 piece puzzle which was featured in Indo American News, our family looked at each other and said we needed to recreate a Konkan Retreat where people could enjoy the outdoors in a socially distanced setting.

Throughout the summer, we spent every weekend looking for the perfect place to carry out our vision of creating our own Gir Cow Farm and Retreat - a place that fosters wellness where families could spend a peaceful time surrounded by nature in a stress-free, socially-distanced environment.

We ditched life in a highrise condo in Houston, and acquired an 85-year-old 5-acre farmhouse near the Big Thicket of South East Texas. We gave the property a healthy dose of TLC, cleared the brush, and installed a cattle fence to corral two highly sought after Gir cows.

What’s so special about Gir cows? Girs, indigineous to India, are known around the world to be highly resistant to disease and hot, stressful conditions- perfect for a quarantine in Texas!. Our Gir cows made their way to Texas from India, via Brazil and Mexico over a period of decades.

The nutritional value of milk produced by Gir cows is exceptional. A2 beta-casein found in the milk Gir cows produce has been linked to less incidence of cardiovascular disease and Type 1 Diabetes. While it does contain lactose, A2 milk is known to be easier to digest than A1 milk and even suitable for some with lactose intolerance. Ancient Vedic text suggests that the distinct hump found in Zebu breeds like the Gir cow makes the quality of the milk superior.

Cow dung and urine are also a valuable source of natural fuel and fertilizer. Dung patties are used in many Hindu purification rituals involving fire. A burger patty from McDonald’s is less valued than a cow dung patty by some! Don’t believe me? Check Amazon.

Our longer term goals include creating a fully-sustainable ecosystem with organically grown produce made with natural fertilizers. Down the road we aim to milk the Gir cows and create pure A2 milk dairy products like loni (butter), lassi, and Kulfi. We plan to create cottages made with natural materials for couples and small groups to enjoy life’s simple pleasures away from it all.

A visit to the farm now promises a warm reception from the hosts, an encounter with the Gir cow and calf in a Gotha called ‘Gokuldham’ – the house of Gir cows - where families can cuddle, pet and feed them, in a safe, secure environment. We have swings, lawn chairs, and field game equipment like Frisbee, soccer, football, golf, slackline, archery, and you can even try your hand at chopping wood using an Axe! You are welcome to bring lawn chairs, blankets, and your own field game equipment. Discover our growing collection of plant life from bamboo, to flowers, to fruits, herbs, and more - let us know if you have a unique sprout you would like to add to our collection!

Saratoga Serendipity plans to host events on every fourth Saturday of the month for the public to meet our cows, enjoy the farm life in a comfortable, socially-distanced environment, and take a break from the daily COVID routine. Our Refreshment Stall is serving home-made Vada Pav Sandwiches, Chicken Kathi Rolls, and Chai (cash only!)

If some people prefer, they can schedule a private session on the farm for your getaway and encounter with the animals. According to TripAdvisor, we are the #1 attraction in all of Saratoga, Texas!

Follow us on Facebook and Instagram at Saratoga Serendipity or on SaratogaSerendipity.com for updates on events and new offerings!

Safety: We strongly recommend and endorse safety measures while on the farm including wearing weather appropriate attire, full-sleeves, close-toed shoes, and masks while on the farm.
However there is space to remain socially distanced and relax with your families and trusted circles.



-----------------------------------------------------------------

Travel & Directions:
Our address is 17190 FM 770 Saratoga, Texas 77585
We are located off FM 770 adjacent to the Entergy substation and across the street from Super Pak Food Mart (formerly Citgo gas station)
Navigate to 12826 Flowers Dr, Saratoga, TX 77585 on Google Maps to be lead directly to our entrance gate.

*If you would like to visit and are open to carpool, let us know*

-----------------------------------------------------------------

***

# मिनिसोटा! (भाग १)

- **केतकी पाटील पारखी** (व्हॅन्कुव्हर, कॅनडा)

शार्लेटच्या ऊष्ण प्रदेशातून आमची रवानगी 'मिनिसोटा' या थंड प्रदेशात झाली. थंड प्रदेश कसला, उत्तर ध्रुवावर झाली म्हणा ना. अमेरिकेतील 'न्यू यॉर्क' सारख्या शहरात वाढलेल्या मुलांचा असा समाज असतो,की न्यू यॉर्क म्हणजे 'इटली मधील रोम' आणि मिनिसोटा म्हणजे 'रशियातील सायबेरिया'. एकीकडे कला, संस्कृती, विद्वत्ता तर दुसरीकडे बर्फ, बर्फ आणि फक्त बर्फच!



स्नो मध्ये गुरफटलेलं मिनिआपोलीस डाउनटाउन

आमच्या शार्लेटमधील एक-दीड वर्षाच्या संसाराचं स्थलांतर 'मिनिआपोलीस' ह्या शहरात झालं. मिनिसोटा राज्यातील नावाजलेलं आणि गजबजलेलं शहर. शार्लेट ते मिनिआपोलीस हा प्रवास जवळ जवळ २० तासांचा. हा प्रवास आम्ही आमच्या गाडीने मजल दर मजल करत पार पडला. शार्लेट दक्षिणेला तर मिनिआपोलीस उत्तरेला. सगळंच विरुद्ध. अमेरिकेत आल्या दिवसापासून बर्फ बघण्याची इच्छा होती आणि आता तर मिनिआपोलिसमध्ये मी बर्फात नाहून निघणार होते.

ऑगस्ट महिन्यामध्ये आम्ही मिनिआपोलीसमध्ये आलो. ऑगस्ट महिना म्हणजे बऱ्यापैकी उन्हाळी वातावरण होतं. अमेरिकेतील बऱ्याच शहरांचे रस्ते हे 'सायकल' चालकांसाठी राखीव आहेत. मुख्यत्वाने डाउनटाउन आणि विद्यापीठाच्या रस्त्याच्या बाहेरील बाजूने सायकल चालकांसाठी सोय केलेली असते. अगदी पुलावर सुद्धा सायकल स्वारांसाठी जागा राखीव आहे. पहिल्याच आठवड्यात आम्ही सायकलवरून मिनिआपोलीस पालथं घातलं. 'Nice Ride' कंपनीच्या सायकल ठराविक ठिकाणी पार्क करून ठेवलेल्या असतात. तुम्ही

मशीनमध्ये पैसे भरायचे आणि पावतीवरचा नंबर सायकलच्या कुलुपावर टाकायचा. मग तास-दीड तासासाठी ती सायकल तुमची. नंतर सोयीच्या ठिकाणी वेळ संपायच्या आत सायकल परत करायची. नदीकाठी सायकल चालवण्याचा अनुभव इकडेच घेता आला. 'मिसिसिपी' नदीचं संथं पाणी अनुभवण्याची हीच संधी.

मिनिआपोलीसचं सौंदर्य खुलतं ते इकडच्या असंख्य सरोवरांमुळे. मिनीसोटा या राज्यात १०,००० पेक्षा अधिक सरोवरे आहेत. उत्तर अमेरिकेतील सर्वात मोठे सरोवर - 'सुपिरियर' हे मिनिआपोलीसजवळचे खास आकर्षण. ह्या प्रत्येक सरोवराच्या असपाची जागा इतकी सुंदर आणि निसर्गरम्य आहे, की थंडी असो वा उन्हाळा, बारा महिने इथे लोकांची रीघ लागलेली असते. कोणी रोज जॉगिंगला, कोणी सायकलिंगला, कोणी पोहायला, कोणी कयाकिंगला, कोणी आपल्या कुत्र्याला- मांजरीला फिरवायला, कोणी बोटीवर तर कोणी बीचवर 'सन बाथ' घ्यायला.

इकडच्या तीव्र थंडीमुळे हि सरोवरे गोठतात. बरेच महिने पांढरा- फटक रंग ह्या सरोवरांची साथ सोडत नाही. गाडी चालवताना सारखं पांढरं पांढरं बघून जरा गरगरायलाच लागतं. पण हे गोठलेलं सरोवर अनुभवण्याची वेगळी पद्धत म्हणजे 'विंटर फ़ेअर'. थंडीतली जत्रा! प्रत्येक लेकची आणि त्यावरील बर्फाच्या थराची चाचणी होते. विशिष्ट उंचीचा बर्फ तयार झाला असेल तर त्या बर्फावर, त्या लेकवर गर्दी झालीच म्हणून समजा. 'आईस स्केटिंग' , 'आईस हॉकी' आणि 'फिशिंग' हे खेळ यावेळी अगदी रंगत येतात. तुम्ही म्हणाल गोठलेल्या बर्फात कसले मासे पकडतायत. पण हे खरं आहे. मासेमारीचं सगळं सामान लोकं आणतात. थंडीत मात्र अत्यावश्यक असलेलं जादा समान म्हणजे ड्रिल. ह्या ड्रीलच्या मदतीने बर्फाला साधारण १५ सें.मी. रूंद असं गोलाकार छिद्र पाडतात. अगदी पाणी दिसेल तोवर. आणि मग त्या छिद्रातून गळ टाकून, मासा गळाला लागेतोवर बसून राहायचं. कुडकुडत! थंडी आणि गरम गरम 'हॉट चॉकलेट' म्हणजे तर पर्वणीच.

ह्या बर्फाची मजाच काही और आहे. सुरवातीला स्नो फॉल सुरू होतो तेंव्हा अगदी बारीक पीठ चाळणीतून पडल्यावर कसं दिसतं तसं काहीसं दिसतं. ह्या पीठावरून गाड्यांची ये-जा झाली, की त्यात रांगोळी काढल्या सारखं वाटतं. आणि मग थरावर थर चढून गालिचाच तयार होतो. एव्हाना झाडांची पानं गळून पडलेली असतात त्यामुळे प्रत्येक काडीवर बर्फाचा थर साठतो. रस्त्यावर, पटांगणावर किंवा इतर जागी ओबड थोबड आकारांवर मखमली बर्फाची चादर ओढली जाते. एकनएक दृश्य डोळयांत साठवून घ्यावं असं. काही दिवस तर एक एक दोन दोन फूट स्नो फॉल होतो. रात्रीतून कामगार ह्या स्नोचे थर रस्त्याच्या कडेला लावून ठेवतात. अत्याधुनुक यंत्रणा वापरून ही कामं चुटकीसरशी होतात. स्नोमुळे रस्ते, गाड्या बंद पडल्या आहेत असा एकही दिवस जात नाही.



बर्फात गोठलेलं झाड!

अमेरिकेचे वेळेनुसार आणि स्थळानुसार ४-५ भाग केले आहेत. मिनिआपोलिस तसं उत्तरेला मध्यात पडतं-मिडवेस्ट'मध्ये. मिडवेस्टमधील सगळ्यात मोठे शहर म्हणजे 'शिकागो' आणि त्यानंतर नंबर लागतो ते 'मिनिआपोलिस' चा. जगभरातील नामवंत कंपन्या मिनिआपोलीसमध्ये एकमेकांशी निखळ स्पर्धा करत आहेत. बऱ्याच 'फॉर्च्युन ५००' कंपन्यांची इथे मुख्यालयं आहेत. 'सेव्हन कूल सिटीज फॉर यंग प्रोफेशनल्स' मध्ये मिनिआपोलीसचा समावेश होतो. 'पॉप्युलर सायन्स' या मासिकाने २००५ मध्ये 'टॉप टेक सिटीज; मध्ये मिनिआपोलीसचा समावेश केला होता.

एव्हाना भारतातील सगळ्यांनाच 'वॉलमार्ट' हे नाव ओळखीचं झालं आहे. गृहोपयोगी वस्तूंचं कमीत कमी ४२,००० ते जास्तीत जास्त २,६०,००० चौरस फूट 'दुकान'. होय दुकानच. इकडे मॉल यापेक्षा मोठ्या जागेत विविध प्रकारच्या छोट्या मोठ्या दुकानांनी भरलेले असतात. 'ब्रॅन्डेड'! शिवाय 'खाऊ- पिऊ- चाऊ- म्याऊ'. तर अमेरिकेमध्ये वॉलमार्ट जवळ जवळ दर ५-१० किलोमीटर वर आहे. पण मिनिआपोलीस मध्ये याला अपवाद म्हणजे 'टारगेट'. टारगेट हा वॉलमार्टचा 'बिछडलेला जुडवा भाई'. खरतर कट्टर प्रतिस्पर्धी! मिनिअपोलीस हे टारगेटचं मुख्यालय त्यामुळे इथ वॉलमार्ट कमी आणि टारगेटची चलती आहे. हजारो हातांना ह्या अवाढव्य दुकानांनी काम दिलं आहे, बळ दिलं आहे.

अमेरिकेतील सर्वांत मोठा मॉल 'मॉल ऑफ अमेरिका' ह्या आमच्या मिनिआपोलीसच्या शेजारच्याच गावामध्ये - 'ब्लूमिंगटन'मध्ये आहे. मिनिआपोलिसच्या आसपासची ८-१० गावं खूप चांगली जोडली गेली आहेत. अर्ध्या तासात गाडीने, बसने किंवा मेट्रोने दुसऱ्या गावात तुम्ही सहज जाऊ शकता. मॉल ऑफ अमेरिका हा मेट्रो चा शेवटचा स्टॉप. मेट्रो सुरू होते विमानतळापासून. म्हणजे प्रवाशांनी विमानतळापासून थेट मॉलमध्ये जायची चांगलीच सोय केली आहे. ह्या मॉल मध्ये खरेदीसाठी, खाण्यासाठी येणाऱ्या लोकांची जेवढी गर्दी असते तेव्हढीच गर्दी 'Indoor Amusement Park'साठी असते. ह्या मॉलमधेच बंदिस्त असं हे पार्क आहे. जवळ जवळ ८ महिने थंडी. आठवडा आठवडा सूर्य दर्शन नाही. मग अशा वेळी विरंगुळ्यासाठी बाहेर पडलं तर एकच उत्तर 'मॉल ऑफ अमेरिका'. हीटेड मॉल. ना थंडीची पर्वा, ना पावसा-पाण्याची, ना बर्फाची पण तीच धमाल, तोच थरार. बघायला गेलं तर फक्त मॉलच्या दरवाज्यांच्या आसपासच हिटर आहेत. बाकी उष्णता निर्माण होते ते दिव्यांमुळे, आसपासच्या गर्दीमुळे. कॅनडाच्या घेर्मेझीअन कुटुंबाच्या मालकीचा हा माल. वर्षभरात साधारण ४० दशलक्ष लोक ह्या माल मध्ये गर्दी करतात आणि प्रत्येक दिवस इथे सेलिब्रेट करतात अगदी शरीर गोठवणारी थंडी असली तरी... क्रमशः

***